**CNR No.MHSI01000430-2025**

## निशाणी १५ खालील आदेश

अर्जदाराने कोर्ट कमिशनर नेमणुकीसाठी अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर सामनेवाला नं. १अ ते १ड यांनी निशाणी १७ वर म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. अर्जदारतर्फे निशाणी १८ वर तर सामनेवाला तर्फे निशाणी १९ वर लेखी युक्तिवाद दाखल केलेला आहे. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अर्जदाराचे अर्जामध्ये थोडक्यात कथन की, सदर अर्ज हा अर्जदाराने अर्ज चालू असतांना नियोजीत घराचे बांधकाम चालू ठेवून न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केलेला आहे व त्यांचा बचाव रद्द करावा म्हणून अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाची नोटीस बजावणी सामनेवाला यांच्यावर होऊनही त्यांचे दांडगाव्याने व दादागीरीने बांधकाम पुढे चालू आहे. त्यामुळे ती परिस्थिती या न्यायालयासमोर येण्यासाठी झालेल्या बांधाकाच्या वस्तूस्थितीचे फोटो लांबी – रुंदी नकाशासह पटलावर येण्यासाठी कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्जदाराचे नुकसान होणार आहे. त्यामुळे कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करणे आवश्यक असलेने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाला क्र. १अ ते १ड यांनी निशाणी १७ वर म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. यात समानेवालाचे थोडक्यात म्हणणे की, अर्जदाराने अर्जामध्ये मागणी केलेल्या वकीलांची कोर्ट कमिशनर नेमणूक करता येणार नाही. कारण वकीलांना सर्वे नंबरची पडताळणी अचूकपणे करुन अहवाल सादर करता येणार नाही. दाव्यातील ७–१२ उता–याचे अवलोकन केल्यानंतर मूळ दाव्याचा निकाल व वाटपानुसार वेगवेगळे ७–१२ उतारे झाले आहेत. त्यामुळे अर्जासाठी योग्य

ते कारण नाही. अर्ज करावयाचा असेल तर भुमी अभिलेख यांची कोर्टकमिशनर नेमणे योग्य व उचित होणारे आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

४. अर्जदाराचे अर्जातील कथन त्यावरील सामनेवालाचे म्हणणे याचा सविस्तरपणे विचार करता अर्जदाराने सदर अर्ज हा विलंब माफीचा अर्ज प्रलंबित असतांना व सामनेवाला विरुध्द ताकीद असतांना दरम्यानच्या काळामध्ये सामनेवाला याने बांधकाम केलेले आहे. तसेच सामनेवाला यांनी बांधकाम करुन आदेशाचा भंग केलेला आहे. सामनेवाला याने दरम्याच्या काळामध्ये बांधकाम केलेले आहे. ही वस्तुस्थिती या न्यायालयासमोर येण्यासाठी कोर्टकमिशनर यांची नेमणूकर करणे आवश्यक आहे. असे कथन केलेले आहे. या अनुषंगाने सामनेवाला यांनी दाखल केलेले म्हणणे याचे सुक्ष्मपणे अवालोकन केले असता त्यांनी बांधकाम केलेले नाही, असे कथन केलेले नाही. तसेच बांधकामासाठी स्थगीती दिली होती, हेही नाकारलेले नाही. त्यामुळे या अर्जाचा निकाल करतेवेळी जागेवर बांधकाम झाले आहे किंवा नाही, याची सत्यता पडताळण्यासाठी कोर्टकमिशनरची नेमणूक करणे योग्य व न्यायीक असे होणारे आहे. तशी नेमणूक केल्यास सामनेवाला यांचे कोणतेही अपरिमित असे नुकसान होणार नाही. उलटपक्षी या आर्जाच्या निकालाकामी या न्यायालयास मदत होणार आहे. सबब, त्यामुळे अर्जदाराने सदर अर्जास योग्य व संयुक्तिक असे कारण दिलेले आहे. त्यामुळे यावरील सर्व कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा निशाणी १७ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मालवण येथील विधीज्ञ यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. अर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की, कोर्टकमिशनर यांची कोर्ट फी रक्कम रु.३०००/- कोर्टामध्ये आदेश झाल्यापासून १४ दिवसांच्या आत जमा करण्याची आहे. तसे न केल्यास अर्ज हा आपोआप रद्द समजण्यात येईल.

४. कोर्ट कमिशनर यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे ठिकाणी उभय पक्षकारांना योग्य ती नोटीस बजावून जागेच्या वस्तुस्थितीचा अहवाल आदेश प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आत सादर करावयाचा आहे.

५. अर्जदाराने आदेशाची पुर्तता केलयानंतर कोर्ट कमिशनर रिट अदा करावी.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.01.16 10:56:54 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १४/०१/२०२६

( श्री.एस.एस.इंदलकर )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.